# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

नियामक मंडळाची दुसरी बैठक दि. १०/०६/९६ रोजी मंत्रालयातील मा. मंत्री (पा) व अध्यक्ष यांचे दालनात झाली.सदर बैठकीत खालील ठरावांना मंजूरी देण्यात आली

ठराव क्र. २/१

"ठराव करण्यात येतो की, पहिल्या बैठकीचा कार्यवृत्तांत, ठराव व ठरावांवरील कार्यवाही वाचून सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे."

**ठराव क्र. २/२**

"ठराव करण्यात येतो की, महमंडळासाठी, निधी उभारण्यासाठी अरेंजर व महामंडळाचे आर्थिक सल्लागार म्हणून डी.एस.पी. कन्सलटंट, मुंबई यांची नेमणूक करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच मे. क्रिसिल यांची रेटिंग एजन्सी म्हणून नेमणूक करण्यास मंजूरी देण्यात येत आहे."

**ठराव क्र. २/३**

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाकडील कामांसाठी पूर्व निर्धारित व निकषास उतरणाऱ्या अशा योग्य वर्गवारीच्या सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये अंगीकृत केलेल्या ठेकेदारातील ठेकेदारांची सूची जाहिरातीद्वारे मागवून त्यास मान्यता देण्याचे अधिकार कार्यकारी समितीला देण्यात येत आहेत. ही सूची वर्षातून एकदा सुधारित करण्याचे अधिकार कार्यकारी समितीस देण्यात येत आहे. या सूचीतील ठेकेदारांकडूनच जाहिर निविदा मागवून त्यातील निविदा स्विकारण्याचे अधिकार कार्यकारी संचालक आणि सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली प्रमाणे प्राधिकृत अधिकाऱ्यांना देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे."

ठराव क्र. २/४

"ठराव करण्यात येतो की, नविन प्रशासकीय मंजूरी प्राप्त प्रकल्पांना वित्तीय तरतूद करण्यात येत असून उपलब्ध अनुदानाप्रमाणे त्या प्रकल्पांना कार्यान्वित करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना सर्वानुमते देण्यात येत आहे. तसेच ज्या प्रकल्पांची प्रशासकीय मान्यता व्यपगत झाली आहे अशा प्रकल्पांचे अंदाज पत्रक सुधारीत करून त्यांना सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करून (यादी प्रमाणे) ते प्रकल्प कार्यान्वित करण्यात यावेत."

(सही)
१३/६/९६

**ठराव क्र. २/५**

"अ) ठराव करण्यात येतो की,सन १९९६-९७ सालात रुपये ७०० कोटीचे रोखे आवश्यक त्या अटीसह त्याच्या टप्प्याटप्प्याने वितरण करण्यास महामंडळाची मान्यता आहे.

ब) ठराव करण्यात येतो की, वरील 'अ' मधील रोखे वितरण करण्याच्या संदर्भात विश्वस्त संस्था म्हणून 'भारतीय स्टेट बँक' यांना नेमण्यास महामंडळाची मान्यता आहे.

क) ठराव करण्यात येतो की, वरील 'अ' मधील रोखे वितरण करण्यासाठी आवश्यक तो

१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ.

२) महाराष्ट्र शासन.

३) विश्वस्त संस्था.

यांच्या मधील त्रिपक्षीय कराराच्या प्रारूपाला मान्यता देण्यात येत आहे. तसेच महामंडळातर्फे ह्या करारावर स्वाक्षरी करण्यास कार्यकारी संचालकांना प्राधिकार देण्यात येत आहे. तसेच शासन निर्देश देईल त्याप्रमाणे आवश्यक ते फेर बदल करण्यात येतील."

**ठराव क्र. २/६**

"अ) ठराव करण्यात येतो की, जे भविष्यकालीन प्रकल्प शासनाने ठरविलेल्या प्रचलित आर्थिक मापदंडात बसत आहेत व ज्यांचा अंतर्भाव राज्याच्या हिश्याच्या ५९४ अब्ज.घ.फू पाणी वापराच्या हिशोबात करण्यात आलेला आहे. त्याना प्रथम प्रशासकीय मान्यता मा. अध्यक्ष यांच्या सहमतीने देण्यात यावी.

ब) ठराव करण्यात येतो की, ज्या प्रकल्पांवरील खर्च प्रशासकीय मान्यतेच्या खर्चापेक्षा १०% हून अधिक किंवा होण्याची शक्यता आहे. अशा प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे प्रस्ताव महामंडळाच्या नियामक समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावेत ."

**ठराव क्र. २/७**

"ठराव करण्यात येतो की, कामाची गती वाढविण्यासाठी महामंडळासाठी शासनाकडून मिळणारे अनुदान एकरकमी त्वरीत देण्यांत यावे व तशी विनंती शासनाला करण्यात यावी."

२३।६।९६

ठराव क्र. २/८

"It is resolved that the Maharashtra Krishna Valley Development Corporation should accept the offer of M/s Kirloskar Consultants Limited, Pune @ Rs. 81,88,000/- (Rupees Eighty One Lakhs Eighty Eight Thousand only) for the work of "Appointment of Consultant's for developing and establishing Management Information System (MIS) for MKVDC, Pune" and Executive Director shall take further action regarding the finalisation of contract."

(रा. गो. कुलकर्णी)
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव,
म.कृ.खो.वि.महामंडळ, पुणे-११.

'मान्य'

मा. महादेवराव शिवणकर
मा.मंत्री (पा) व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.महामंडळ, पुणे-११.

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.

## प्रशासकीय मान्यता व्यपगत झालेल्या प्रकल्पांची यादी.

| अ.क्र. | प्रकल्पाचे नांव |
|---|---|
| १. | चारोली ल.पा. प्रकल्प,<br>ता. खेड, जि. पुणे. |
| २. | माजगांव को.प. बंधारा,<br>ता. व जि. सातारा. |
| ३. | जांभळी ल.पा. प्रकल्प,<br>ता. वाई, जि. सातारा. |
| ४. | धनगरवाडी ल.पा. प्रकल्प,<br>ता. जि. कोल्हापूर. |
| ५. | खामकरवाडी ल.पा. प्रकल्प,<br>ता. जि. कोल्हापूर. |
| ६. | नांदारी ल.पा. प्रकल्प,<br>ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर. |